सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजना - (२२३५-०११३) या लेखाशिर्षाखालील सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजुर असलेली तरतूद वितरीत करणे बाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. अपअ-२०१८/ प्र. क्र.४२ / का-९
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- १८ मे, २०१८

वाचा- १) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दि.०२.०४.२०१८
२) महिला व बाल विकास विभाग शासन परिपत्रक क्र. बीजीटी-२०१८/ प्र.क्र.३३/का-४, दि. ०५.०४.२०१८
३) परिविक्षा अधिक्षक, महिला व बाल विकास, पुणे यांचे पत्र क्र. मबाविआ/ अपअ/ १८-१९/ का-७/३०२७, दि. १० मे, २०१८

शासन निर्णय-

मागणी क्र. एक्स-१, २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२- समाज कल्याण, १०६ सुधार सेवा, (००), (०१)(०१) सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजना (२२३५-०११३), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात जनहित याचिका क्र. १०७ /२०१४ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार रु.२,००,००,०००/- (रुपये दोन कोटी) तरतूद अर्थसंकल्पीत केली आहे. तथापि सदर योजनेखाली रु.२,००,००,०००/- (रुपये दोन कोटी) तरतूद वितरीत करण्यास वित्त विभागाची अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदी मधील महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दि. १४.१०.२०१६ अन्वये मंजुरी मिळालेल्या रु.१२,५०,०००/- (रुपये बारा लाख पन्नास हजार) तरतूद वाचा क्र.१ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकान्वये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात (२२३५-०११३) या लेखाशीर्षाखाली पुढील प्रमाणे वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

लेखाशीर्ष	उद्दिष्ट	मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत केलेली तरतूद	शासन निर्णय दि. १४.१०.२०१६ अन्वये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत तरतूदी मधील वितरीत करावयाची मंजुर तरतूद
१	२	३	४
२२३५-०११३	३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)	२,००,००,०००	१२,५०,०००
एकूण-	-	**२,००,००,०००**	**१२,५०,०००**

२. वरील तक्त्यातील स्तंभ क्र.४ येथे दर्शविण्यात आलेला निधी महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियमपुस्तिका व वित्तीय अधिकार नियमपुस्तीकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच वित्त विभागाच्या दि.०२ एप्रिल, २०१८ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करुन खर्च करण्यात यावा. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणुन आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे हे राहतील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/ प्र. क्र. ६९/ अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ मध्ये नमुद केलेल्या अटी व त्यासोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या या आदेशास लागु होणा-या अटी व शर्तींची पुर्तता होत असल्याने, विभागाच्या स्तरावरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असुन, त्याचा सांकेतांक क्र. २०१८०५१९१२२६०९२८३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pratibha Sanjay Chaudhari

Digitally signed by Pratibha Sanjay Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b473b4ee37ba1cee5a359333e2009303b170cfa656f3ab1231d2ba1fbf6e04cf, cn=Pratibha Sanjay Chaudhari
Date: 2018.05.19 12:24:50 +05'30'

(प्रतिभा चौधरी)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्तालया मार्फत)
६. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. कक्ष अधिकारी (व्यय-६ / अर्थसंकल्प-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती (का-९)